**B.A. (Part—II) (Semester—IV) Examination**

**(Optional Subject)**

**MARATHI LITERATURE**

**(Literature of Modern Language)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :—(1) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतांना गृहित धरल्या जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण करा :— 16

(अ) "घेकी परलु महाराज घे. कॉलेज शिकायलाईस म्हणून काय झालं. पोटाला लाजायचं नसतं."

**किंवा**

"जोरात-म्हण भाड्या, काय खालाच का नाही. आमचे पयलचे म्हार व्हते तर ते 'झ्यार' एवढ्या जोरात टाकीत की सुताराच्या माळाला घुमे तो."

(आ) "बाबा राहा रं इतंच किसन्या भाड्या लई दलाल. कावळ्यावनी हाय तो. तो काय देयालाच तुला दुकान करून."

**किंवा**

"आरं परलाद तू लई भेकोरा यार गांडू हैस. अशानं नाही जमतरं माय माणसानं हरेक हुन्नर शिकावं, निसतं लेव्हव्यानं भागत नाही."

(इ) "पापीणी पापीणी कव्हणासि बिढार देऊनि बैसलीसि: तेने माहात्मेनि आम्हा कुजांतर केले : माझेया कुटुंबाचा मुळी इळा घातला."

**किंवा**

"आरे : सांडि सांडि : हे रूम्हणें : हीरडीया फुटति : रगत नीगे : परि न संडी : ना माझेनि बापें सांधितले : दुख होए परि न संडी."

(ई) "जी जी जाणेंवीण कळा माळवलीया जी : जाणेंवीण कळा पोरटीया जालीया जी : आजि कळेचें माहेर भेटलें : गोसावी सकल वीहोचें माहेर :"

**किंवा**

"पैलु आमचीया गाइ राखे तो साक्षात श्रीकृष्णु : गोसावी एती : मां एकु पाओं तुं धरि : एकु पाओं मीं धरीन : मां गोसावी यांते पुसों : 'तुम्ही काई ?' :"

2. 'आठवणींचे पक्षी'चा आत्मकथनाचे वाङ्मयीन मूल्यमापन करा. 16

**किंवा**

प्रल्हादचे व्यक्तिचित्र रेखाटा.



139 139 139 139 139

3. (अ) 'धोंडिबा दाजी' चे स्वभावचित्र रेखाटा. 8

**किंवा**

रमाकांत आणि मुसलमान पाटील या दोघांच्या घरी प्रल्हादला आलेल्या अनुभवाविषयी थोडक्यात लिहा.

(आ) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील बोलीभाषेंचे स्वरूप विशद करा. 8

**किंवा**

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील भूकेचे चित्रण करा.

4. (अ) लीळाचरित्रातील कथांचे वाङ्मयीन मूल्यमापन करा. 8

**किंवा**

समाजसुधारक श्रीचक्रधरस्वामींच्या समाज सुधारणांविषयीच्या विचारांवर प्रकाश टाका.

(आ) लीळाचरित्रातील कथांच्या आधारे महानुभाव संप्रदायातील सामाजिक विचारंची चर्चा करा. 8

**किंवा**

श्रीचक्रधर स्वामीचे स्त्री विषयक विचार प्रस्तुत कथांच्या आधारे उलगडून दाखवा.

5. खालीलपैकी वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांसाठी अचूक उत्तर निवडा :—

(1) प्रल्हादच्या पायातून कोरल्यानंतर किती काटे निघाले ? 1

(अ) 32 (ब) 51

(क) 13 (ड) 35

(2) मिलिंद महाविद्यालयाची स्थापना कोणी केली ? 1

(अ) म. गांधी (ब) विनोबा भावे

(क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (ड) स्वातंत्र्यवीर सावरकर

(3) विद्यार्थीदशेपासून ते मुलेबाळे होईपर्यंत प्रल्हादला लळा लावणाऱ्या शिक्षकाचे नाव काय ? 1

(अ) लक्ष्मीकांतराव (ब) ना.म. वानखडे

(क) प्राचार्य म.ना. वानरपाडे (ड) प्राचार्य राऊत सर

(4) प्रल्हादने महाविद्यालयीन शिक्षण कुठे घेतले ? 1

(अ) अमरावती (ब) औरंगाबाद

(क) उदगीर (ड) मुंबई

(5) प्रल्हादने आपला जीवनानुभव 'आठवणींचे पक्षी' मधून कोणत्या भाषेत सांगितला आहे ? 1

(अ) प्रमाण भाषा (ब) प्रमाण मराठी भाषा

(क) कन्नड भाषेतून (ड) बोली भाषेतून

(6) राजूर बोर्डिंगमध्ये प्रल्हादला कोणते दोण आजार जडले ? 1

(अ) ताप व सर्दी (ब) खरुज व कावीळ

(क) कावीळ व डोकेदुखी (ड) खरुज व सर्दी

(7) त्रेता युगात पुढीलपैकी कोणता धर्म मानल्या जात होता ? 1

(अ) मातापित्याची भक्ती (ब) सर्वधर्मसमभाव

(क) वैदिक धर्म (ड) महानुभाव पंथ

(8) 'बळ्हेग्राम' या गावाचे पूर्वीचे नाव काय होते ? 1

(अ) जेजुरी (ब) पाचाड

(क) पोलादपूर (ड) सत्यापूर

(9) प्रल्हाद मॅट्रिकची परीक्षा कोणत्या श्रेणीत उत्तीर्ण झाला ? 1

(अ) प्रथम (ब) द्वितीय

(क) तृतीय (ड) नापास

(10) 'लीळाचरित्र' या ग्रंथाचे लेखक कोण ? 1

(अ) म्हाइंभट (ब) केशोराजबास

(क) दामोदर पंडीत (ड) श्रीचक्रधरस्वामी

(11) श्रीचक्रधरस्वामी यांनी किती नाड्यांचा उल्लेख केला आहे ? 1

(अ) पाच (ब) नऊ

(क) सात (ड) तीन

(12) नागदेवाच्या अहंकाराने निराश होऊन श्रीचक्रधरस्वामी यांनी त्यांना कोठे पाठविले ? 1

(अ) अचलपूर (ब) भंडारा

(क) रिद्धपूर (ड) सावळापूर

(13) 'कौरवां सवावो' या कथेत अर्जुन श्रीकष्णाच्या कोणत्या बाजुने बसला ? 1

(अ) डोक्याच्या बाजूने (ब) पायाकडून

(क) डावीकडून (ड) उजवीकडून

(14) नृत्यांगणेने श्रीचक्रधरस्वामी यांचा गौरव पुढीलपैकी कोणत्या शब्दांत केला ? 1

(अ) गोसावी कलाकार आहेत (ब) गोसावी सकल विघेचे माहेर

(क) गोसावी कलेचे प्रशंसक आहेत (ड) सर्वज्ञ

(15) सश्याचे रक्षण कोणी केले ? 1

(अ) श्रीचक्रधरस्वामी (ब) चांगदेव राऊळ

(क) श्रीकृष्ण (ड) गोविंदप्रभु

(16) खालीलपैकी कोणता शब्द 'हत्तीचा दृष्टांत' या कथेत 'हत्ती' करीता वापरला आहे ? 1

(अ) हाथी (ब) हस्थी

(क) हस्ति (ड) हास्थी